**निशाणी क्र. ५८ खालील आदेश नियमीत दरखास्त क्र. ०१/२०११**

सदरचा अर्ज दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश २२, नियम ४ अन्वये मयत प्र. वादी/ऋणको क्र. १ रामदास रावबा बच्छाव यांच्या वारसांची नांवे सदर दरखास्तीमध्ये समाविष्ट करण्याकरीता परवानगी मिळणेबाबत दाखल करण्यात आला आहे.

०२. अर्जदार/वादीचे कथन असे की, सदर दाव्यातील प्र.वादी/ऋणको क्र. १ रामदास रावबा बच्छाव हे दिनांक २८/०४/२०२१ रोजी मयत झाले. सबब, वरील मयत प्र. वादी/ऋणको क्र. १ रामदास रावबा बच्छाव यांच्या वारसांची नांवे सदर दरखास्तमध्ये समाविष्ट करून दरखास्त दुरूस्त करण्याची परवानगी मिळणेसाठी सदर अर्ज दाखल केला आहे. त्यामुळे मयत प्र.वादी/ऋणको क्र. १ रामदास रावबा बच्छाव यांचे वारस दरखास्तमध्ये देणेची विनंती केली. प्र.वादी/ऋणको यांनी सदर अर्जावर त्यांचे म्हणणे सादर केले नाही. सबब, सदर अर्ज त्यांच्या म्हणण्याशिवाय चालविण्यात आला. तसेच त्यांच्या युक्तिवादाशिवाय सदर अर्ज चालविण्यात येत आहे.

०३. वादी/धनको यांची सदर अर्जातील विनंती याचा विचार केला. वादी/धनकोने प्र.वादी/ऋणको क्र. १ रामदास रावबा बच्छावचे वारस दरखास्तीमध्ये समाविष्ठ करण्यासाठी सदरचा अर्ज दाखल केला आहे. वादी/धनकोने मयत प्र.वादी/ऋणको क्र. १ रामदास रावबा बच्छाव यांच्या मृत्यु प्रमाणपत्राची छायांकीत प्रत अर्जासोबत दाखल केली आहे. वादी/धनकोची सदर अर्जातील विनंती याचा विचार केला. प्रस्तुतची दरखास्त ही नियमीत दिवाणी दावा क्र. ३५/२००८ मधील झालेल्या हुकूमाची अंमलबजावणी करण्याकरीता दाखल केली आहे. त्यामुळे मयत प्र.वादी/ऋणको क्र. १ रामदास रावबा बच्छाव यांचे वारस सदर दरखास्तीमध्ये समाविष्ठ करणे गरजेचे आहे. म्हणुन वरील बाबीचा विचार करता सदरचा अर्ज मंजूर करणे न्यायोचित आहे. सबब, मी खालील आदेश पारित करीत आहे.

**—:: <u>आदेश</u> ::—**

०१. अर्ज मंजूर करण्यात येतो.

०२. वादीं/धनकोला आदेशीत करण्यांत येते की, सदर अर्जात मागणी केल्याप्रमाणे मयत प्र.वादी/ऋणको क्र. १ रामदास रावबा बच्छाव यांच्या वारसांची नांवे सदर दरखास्तीमध्ये समाविष्ट करून त्याप्रमाणे दुरूस्ती करावी. वादीने कॉस्ट म्हणुन रूपये २००/— तालुका विधी सेवा कळवण यांच्याकडे जमा करावे.

०३. वादीने दुरूस्तीची प्रत सदर दरखास्तीमध्ये दाखल करावी.

DNYANESHWAR MADHUKAR GITTE

Digitally signed by DNYANESHWAR MADHUKAR GITTE
Date: 2022.02.17 00:34:14 +0530

( डि.एम.गित्ते )
दिवाणी न्यायाधीश, क. स्तर,
कळवण.

ठिकाण :— कळवण.
दिनांक :— २२/०२/२०२२.